या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

9403641482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार २८ मे २०२४ | अंक१६९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# पालकमंत्री साहेब कुणबी नोंदी तुमच्यामुळे नव्हे तर जरांगे दादांमुळे मिळाल्या हनूमान मुळीक

## धनंजय मुंडे यांनी श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये हनुमान मुळीक (जरांगे पाटलांचे सहकारी)



बीड : मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने गेल्या वर्षभरापासून मनोज जरांगे पाटील यांनी राज्यभरात हा प्रश्न ज्वलंत करत मराठवाड्यामध्ये ज्या कुणबी नोंदणी सापडत नव्हत्या त्या कुणबी नोंदणीच्या अनुषंगाने राज्य सरकारला जागे करण्याचे काम केले. यात अनेक मराठा युवकांनी आपले बलिदान दिलेले आहे. यासर्व बाबींमुळे राज्यभरात ज्या नोंदी सापडत नव्हत्या, त्या नोंदी सापडल्या व लाखो युवकांना कुणबी प्रमाणपत्र मिळाली. यात बीड जिल्ह्यात सुद्धा हजारो युवकांना हे प्रमाणपत्र मिळाली आहेत. याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न पालकमंत्री साहेब आपण करु नये, याचे सर्व श्रेय मनोज दादा जरांगे पाटील व ज्या युवकांनी आपले बलिदान दिले आहे, त्यांना जात असल्याचे मत मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी हनुमान मुळीक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे. यासह त्यांनी जिल्हा प्रशासनाने केलेल्या सहकार्य बद्दल आभार देखील मानले आहेत.

गेल्या अनेक वर्षापासून मराठा आरक्षण व इतर प्रश्न सरकार दरबारी प्रलंबित होते. यामध्ये अनेक वेळा मराठा समाजाला निराशाचा सामना करावा लागला. यामध्ये अनेक युवक निराश होऊन त्यांनी आपलं जीवन सुद्धा संपवले, या सर्व बाबीच्या अनुषंगाने गेल्या वर्षभरापासून मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला धारेवर धरण्याचे काम केले. ज्या कुणबी नोंदी सापडत नव्हत्या त्या कुणबी नोंदी जरांगे पाटलांच्या उपोषणामुळे व लढ्यामुळे सापडू लागल्या व मराठा युवकांना प्रमाणपत्र मिळाले. राज्यभरामध्ये लाखो मराठा समाजाला ही प्रमाणपत्र मिळाले आहे. मराठा आरक्षणाचा लढा अजूनही सुरू असून या लढ्यासाठी मनोज जरांगे पाटील रात्रंदिवस संघर्ष करत आहेत. बीड जिल्ह्यात सुद्धा हजारो युवकांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले आहेत, परंतु याचे श्रेय घेण्याचा केविलवाना प्रयत्न बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे करत असून पालकमंत्री साहेब आपण श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये, ज्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, जे कुणबी प्रमाणपत्र मिळाले आहेत ते सर्व मनोज दादा जरांगे व ज्या युवकांनी बलिदान दिला आहे त्यांच्यामुळे मिळाले असल्याचं मत प्रसिद्धी पत्रकाद्वारे मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी हनुमान मुळीक यांनी व्यक्त केले आहे. तसेच जिल्हा प्रशासनाने केलेल्या विशेष सहकार्याबद्दल त्यांनी त्यांचेही आभार मानले आहे.

## नैसर्गिक आपत्तीत्त नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी संपर्क क्रमांक

**बीड प्रतिनिधी**

बीड, दि. 27 :-25 व 26 मे 2024 रोजी बीड जिल्हयाच्या काही भागात वादळी वारे व वीज पडल्याने शेतीपिकांचे व पशुधनाची हानी झालेली आहे. या नुकसानीची पाहणी करुन पंचनामे करण्याचे आदेश सर्व उपविभागीय अधिकार आणि तहसीलदार यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

बाधित व्यक्तींना मदत करण्यासाठी सर्व तहसिल कार्यालयांमध्ये नायब तहसीदार महसूल यंचा समावेश असलेला नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. काणेत्याही नागरिकांना नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीबाबत काही माहिती द्यावयची असल्यास त्यांनी खालील क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांनी केले आहे

तालुक्याच्या तहसीलदार व नायब तहसीलदार यांची नाव व दुरध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत.

बीड-सुरेंद्र डोके, मो. 9422742675, गेवराई- सुभाष कट्टे 8484914444, शिरुर शिवनाथ खेडकर 9922622025, वडवणी- संजय जिरंगे 9552064767, धारुर- प्रकाश गोपड 7276734488, अंबाजोगाई सचिन देशपांडे 9921764444, केज- लक्ष्मण धस 98504283483, परळी-बाबाराव रुपनर 9422930542, पाटोदा- संतोष बन 9422550890, आष्टी- बाळदत्त मोरे- 7719950999 आणि माजलगाव परमेश्वर चाफाकानडे 7719950999

## कु. आकांक्षा नितीन जोगदंड हिचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**बीड प्रतिनिधी**



बीड दि.२७ (प्रतिनिधी) द.बा. घुमरे, धांडे नगर बीड ची विद्यार्थिनी कु. आकांक्षा नितीन जोगदंड हिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करताना ८९.८०% गुण मिळवले आहेत. तिच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. कु.आकांक्षा नितीन जोगदंड ही बीड योगभूषण चे संपादक नितीन जोगदंड यांची कन्या आहे. तिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत ८९.८० % टक्के मिळवले आहेत. तिच्या या यशासाठी आई अर्चना जोगदंड, आजोबा दिलीप जोगदंड, आजी शकुंतला जोगदंड यांचे विशेष परिश्रम घेतले आहे. आकांक्षा ने कसलीही टिवीशन न लावता अथक परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यास करून हे यश मिळवले आहे. कु.आकांक्षा हिने इंग्रजी या विषयात ८६, मराठी ७९, हिंदी ८२, गणित ९५, सायन्स अँड टेक्नलॉजी ९४ आणि सोशल सायन्स ९२ असे गुण मिळवत एकूण ५०० पैकी ४४९ गुण मिळवले आहेत. तिच्या या यशाबद्दल द.बा.घुमरे शाळेचे मुख्याध्यापक, वर्गशिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह सर्व पत्रकार बांधव आणि नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये ,अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

**प्रतिनिधि/बीड** , दि. 27 :- भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Combined Defence Service (CDS) या परिक्षेची पुर्व तयारी करुन घेणेसाठी छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दिनांक 10 जून 2024 ते दिनांक 23 ऑगस्ट 2024 या कालावधीत CDS कोर्स क्रमांक 63 चे आयोजन करण्यात येत आहे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थीना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते. तरी बीड जिल्हयातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोग घेण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बीड येथे दिनांक 6 जुन 2024 रोजी मुलाखतीस हजर राहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाइटवर सर्च करुन त्यामधील CDS-63 कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन यावे.सदर सी डी एस वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खालील नमुद पात्रता असणे आवश्यक आहे व त्या संबंधीचे पात्रता प्रमाण्पत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेऊन यावेत. उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. उमेदवार लोकसंघ आयोग (UPSC) नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणा-या सा डी एस (CDS) या परीक्षेकरीता ऑनलाईन द्वारे अर्ज केलेला असावा.अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई मेल आय डी : training. pctcnashik@gmail.com व दुरध्वनी क्रमांक 0253-2451032 वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष किंवा व्हाटसअप क्र. 9156073306 वर संपर्क करावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांनी केले आहे.

## निर्लेखीत शासकीय वाहनाचा लिलाव

बीड, दि. 27 :-जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बीड येथील शासकीय मोटर वाहन क्रमांक एम.एच. 12 डब्ल्यु 4806 जीप महेंद्रा ॲन्ड महेंद्रा कमांडरचे आयुष्यमान 25 वर्षापेक्षा जास्त झाले असून धावसंख्या 219157 इतकी झाल्यामुळे निर्लेखीत करण्यात आलेले आहे. प्रादेशीक परिवहन अधिकारी बीड यांनी सदर शासकीय वाहनाची लिलावाकरीता अंदाजे किंमत रुपये 35000/- इतकी ठरविलेली आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी दिनांक 5 जून 2024 पर्यंत या कार्यालयाशी संपर्क साधून शासकीय वाहन खरेदी लिलावाकरीता हजर राहावे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांनी कळविले आहे. अधिक माहीतीकरीता 02442-222105, 9404862613 या क्रमांकावर संपर्क साधावा.

## कु. हार्मीका बालाजी जगतकर हिचे दहावी बोर्ड परिक्षेत उत्तुंग यश

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

तुलसी इंग्लिश स्कुल बीडची विद्यार्थिनी कु.हार्मीका बालाजी जगतकर हिने राज्य माध्यमिक शालांत परिक्षेत 91.80 टक्के गुण घेवून प्रथमश्रेणीत येण्याचा बहुमान मिळविला आहे. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल तिचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. कु.हार्मीका बालाजी जगतकर हिने इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेमध्ये 91.80% गुण घेऊन उत्तुंग यश संपादित केले आहे. कु.हार्मिका ही तुलसी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या सौ.उमाताई जगतकर व बीड अक्षरधामचं संपादक प्रा.बालाजी जगतकर यांची कन्या आहे. कु.हार्मिका हिने अथक परिश्रम सातत्यपूर्ण अभ्यास करून घरीच अभ्यास करून हे यश संपादन केले आहे.कु. हार्मिका ही खूप गुणवान असून लहानपणापासून विविध स्पर्धा परिक्षेतही तिने यश संपादन केले आहे. कु.हार्मिका हिने इंग्लिश विषयात 71, मराठी 84, हिंदी 84, गणित 93, सोशल ॲण्ड टेक्नॉलॉजी 95, सोशल सायन्स या विषयात 88 मार्क असे 500 पैकी 444 मार्क घेतले आहेत. तिच्या या यशाबद्दल तुलसी इंग्लिश स्कुलच्या प्राचार्या, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पत्रकार बांधवांनी अभिनंदन केले आहे.





















## कविता

# रक्तदानशूर

रक्तदान नवे जीवनदान*
ही व्हावी सर्वत्र जनजागृती
रक्तदात्याचेही महत्त्व कळावे
पसरू दे देवा त्यांची कीर्ती

असतील अनेक रक्तदाते
मजला माहित एक रक्तदान शूर
समाजसेवेचा त्यांनी घेऊनी वसा
नाव तयाचे श्री हिरवे सर

पस्तीस वेळा रक्तदान करूनी
नित्य केले हो सत्कर्म
जनसेवा करून त्यांनी
दर्शविला माणुसकीचा धर्म

सर, आहात तुम्ही करोना वीर
म्हणून आहे तुमची ख्याती
आपणांस जनांचे स्नेह लाभावे
पसरू दे तुमच्या कार्याची कीर्ती

जॉय ऑफ गिविंग संस्था उभारून
देता गोरगरिबांना मदतीचा हात
विविध प्रकारचे सहाय्य करून
दुर्लक्षितांना असते संस्थेची साथ

ज्ञानदानाचे पवित्र कार्य
तुमच्याकडून रोज घडते
वाचनाच्या छंदातूनच
इतरांना पुस्तक भेट मिळते

उदंड आयुष्य लाभो आपणांस
ज्यांनी दिले इतरांना जीवनदान
आदर्शवत व्यक्तिमत्व पाहून
मिळावे इतरांना सत्कर्माचे ज्ञान

विद्या दत्तात्रय पवार (शिक्षिका)
शिवाई विद्यालय भांडुप

# किमान धार्मिक स्थळ परिसर स्वच्छता व पावित्र्य जपा - नवनाथ शिराळे पाटील

## स्वच्छता व पाणीपुरवठा याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे...!

**( बीड प्रतिनिधी )**
बीड नगरपरिषदेत प्रशासकाच्या दुर्लक्षपणामुळे संपूर्ण शहरात घाणीचे साम्राज्य असून, सर्वत्र दुर्गंधी पसरल्याने जनसामान्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेषत: शहरातील बिंदुसरा नदी काठी असणारे सोमेश्वर मंदिर, कृष्ण मंदिर, मारुती मंदिर, खासबाग तुळजाई देवी मंदिर, पीर बाले दर्गा बालेपीर, मनशूर शहा दर्गा, शहंशावली दर्गा, कंकालेश्वर मंदिर, नीळकंठेश्वर मंदिर, सावता माळी चौक आदि परिसरात प्रचंड घाणीचे साम्राज्य निर्माण झाले. मृत जनावरे, कोंबड्यांचे पंखांची घाण शिवाय शहरातील कचरा नदी किनारी टाकल्याने मंदिर, मशिद परिसरात नागरिकांना दुर्गंधीशी सामना करावा लागतो. धार्मिक स्थळ परिसरात स्वच्छता व पावित्र्य राखण्याचे काम नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी करावे असे आवाहन भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा नगर परिषद माजी सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे. तसेच मान्सून पूर्व बीड शहराची नाले साफ सफाई, कचऱ्याचे ढीग उचलून तातडीने साफ सफाई करणे आवश्यक आहे. शहरात तीव्र पाणी टंचाई असून, अद्याप अनेक भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात नाही. गोरगरीब जनतेची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवण्यासाठी



नगर परिषद प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी. यापूर्वी वारंवार मागणी करूनही मुख्य अधिकारी व प्रशासक यांनी गांभीर्याने दखल घेतलेली नाही. तरी आठ दिवसाच्या आत नाले सफाई, पाणी पुरवठा वेळेवर केला नाही तर भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही मार्गाने आंदोलन केले

# संत तुकाराम विद्यालय शिंगी शाळेचा इयत्ता १०वीचा निकाल ९५.१८ टक्के



कु वैष्णवी बाराहाते



कु. तेजस्विनी साळुंके



चि ओमकार शेजुळ



चि.अनिकेत काकडे



**सुनिल झिंजूर्डे पाटील**
शिंगी येथील पंडीत दीनदयाल उपाध्यय शिक्षण संस्थेचे संत तुकाराम विद्यालय या शाळेचा इयत्ता १०वीचा निकाल ९५.१८ टक्के लागला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक बोर्ड परीक्षेत शाळेतील इयत्ता १०वीचे एकूण ८३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते, त्यापैकी एकूण ७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामध्ये प्रथम- कु वैष्णवी मच्छिंद्र बाराहाते (८५.४० टक्के), द्वितीय- कु. तेजस्विनी भारत साळुंके (८४.२० टक्के) तृतीय -चि अनिकेत सुभाष काकडे (८४.०० टक्के) तृतीय - चि ओमकार शेजुळ (८४.००टक्के) कु वेदांती भागीनाथ नरोडे (८३.२० टक्के), कु प्रेरणा कपिल बनकर (८३.२० टक्के), कु श्रद्धा योगेश लेकुरवाळे (८१.८० टक्के), चि वैभव शिवाजी जाधव (८१.४०) कु पल्लवी कैलास तिखे (८०.२० टक्के) कु. ऋतुजा गोकुळ कासार ( ७९.०० टक्के), चि आदित्य अभयशिंग वाखुरे (७८.६० टक्के), कु कोमल चंद्रकांत मापारी (७८.२० टक्के), कु ऋतुजा वाल्मिक जिवरग (७७.४० टक्के) या प्रमाणे यश संपादन केले. उच्च श्रेणीत १९, प्रथम श्रेणीत ३६, द्वितीय श्रेणीत १९ , पास श्रेणीत ५ श्रेणीत विदयार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री हरीभाऊ बागडे नाना, उपाध्यक्ष मा. श्री देवजीभाई पटेल, कोषाध्यक्ष मा. श्री विवेकजी हंबर्डे, सचिव मा. श्री निवृत्ती गावंडे, प्राचार्य प्रतिनिधी मा. श्री विठ्ठल वायाळ, शिक्षक प्रतिनिधी श्री सुरेश पठाडे, शालेय समिती अध्यक्ष श्री डिगंबर पा. वाखुरे, केंद्रीय दक्षता अधिकारी श्री संजय पाटील तिखे, सदस्य मा बाबुलाल शेख, श्री हरिभाऊ तिखे व सर्व शालेय समिती सदस्य यांच्यासह मुख्याध्यापक श्री प्रमोद सोनवणे यांच्या सह पालक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांने अभिनंदन केले.

# पिंपळेगुरव परिसरातील वैदु समाजाचा सामुदायिक विवाह सोहळा

लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या आशीर्वादाने कु.सारंग लोखंडे व समस्त पिंपळे गुरव वैदुवस्ती ग्रामस्थांच्या वतीने आज वैदु समाज सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. जनमाणसात सामाजिक एकात्मतेचा संदेश रुजविणाऱ्या या विवाह सोहळ्याला शंकर जगताप उपस्थित होते . समुदायिक विवाह सोहळ्यामुळे अमाप होणारा खर्च कमी करून वैदु समाजाने हा सामुदायिक सोहळा आयोजित करून इतर समाजापुढे आदर्श ठेवला आहे. ही मोठी अभिनामास्पद बाब आहे. हा सोहळा पाहून अत्यानंद झाला. या विवाह सोहळ्यात विवाहबद्ध होणाऱ्या दाम्पत्यांना शंकर जगताप यांनी सुखी संसारासाठी शुभेच्छा दिल्या व आयोजकांचे आभार मानले. यावेळी मा.नगरसेवक श्री.सागर अंघोळकर, मा.नगरसेविका सौ.वैशालीताई जवळकर, मा. स्वीकृत सदस्य श्री.महेश जगताप, सामाजिक कार्यकर्ते श्री.राहुल जवळकर, लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप कला क्रीडा अकादमी अध्यक्ष श्री.माऊलीशेठ जगताप, श्री.शशिकांत दुधारे , श्री. दिपक काशीद, भरत शिंदे, श्री संजय लोखंडे, श्री.गणेश लोखंडे, श्री. दशरथ लोखंडे, श्री.दशरथ शिंदे,



श्री.शंकर शिंदे, श्री.सुरेश लोखंडे, श्री.शंकर लोखंडे, श्री.शंकर यलाप्पा लोखंडे, श्री बाबू लोखंडे, श्री. बाबासाहेब लोखंडे, श्री. सुरेश लोखंडे, श्री राहुल शिंदे, श्री. रामदास लोखंडे, श्री.शिवाजी लोखंडे, श्री.सूरज लोखंडे आणि पिंपळे गुरव परिसातील नागरिक बांधव उपस्थित होते.

# माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीच्या निकालात वडवणी तालुक्यात डंका(गार्डी दिशा ९९% गुण मिळवून वडवणी तालुक्यात प्रथम)

**बीड प्रतिनिधी**

(वडवणी तालुक्यातून प्रथम, द्वितीय आणि तृतीय तिन्ही विद्यार्थी सिंदफणाचेच) वडवणी प्रतिनिधी (श्रीनिवास काकडे) वडवणी तालुक्यामधील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी वडवणी तालुक्यातून सर्वात जास्त गुण मिळवून तालुक्यातून गार्डी दिशा,99%,प्रथम, वायचळ श्रीकांत98.60% दुतीय , आळणे दिव्या 98.40% तृतीय हे तिन्ही विद्यार्थी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचेच आहेत ,95% पेक्षा जास्त गुण मिळवणारे 16 विद्यार्थी आहेत, 90 % पेक्षा जास्त गुण मिळणारे एकूण 35 विद्यार्थी आहेत म्हणून सध्या वडवणी तालुक्यात या विद्यालयाचा शिक्षण क्षेत्रात बोल बाला असून इयत्ता दहावीच्या निकालात 99% मिळवण्यापर्यंत विद्यार्थ्यांनी मजल मारली आहे म्हणून यंदा दहावीच्या निकालात वडवणी तालुक्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा डंका आहे

सविस्तर वृत्त असे की महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ पुणेयांच्या वतीनेएसएससी बोर्डाच्यापरीक्षा मार्च मध्ये घेण्यात आल्या होतया त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला असूनवडवणी तालुक्यातील माध्यमिकवउच्चमाध्यमिकविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीभरघोस गुण मिळवून यश संपादन केले आहे त्याबद्दल सिंदफणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शिवाजीभाऊ रांजवन साहेब, सचिव मा. प्रतापरावजी रांजवन साहेब,मुख्याध्यापक जगन्नाथ सरवदे सर,विद्यालयाचे पर्यवेक्षक यशवंत भोसलेआणि इतर मान्यवरांनी वडवणी तालुक्यातून प्रथम दुतीय आणि तृतीय येणाऱ्याया विदयारथयांबरोबरच दहावी उत्तीर्णसर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत गार्डी दिशा 99%गुण(तालुक्यात वडवणी) वडवणी तालुक्यातून माझा प्रथम क्रमांक आल्याबद्दल मला खूप आनंद आहे माझ्या यशाचे सारे श्रेयआमच्या शाळेचे सर्व शिक्षकआणि आई-वडिलांना देते शंभर टक्के मिळविण्याच्या उद्देशाने मी अभ्यास केला अवघड प्रश्न सोडवण्यावर भर दिला प्रत्येक दिवशी सहा ते सात तास सातत्याने अभ्यास केला अभ्यासात मला माझ्या आई-वडिलांनी मदत केली भोसले सर ,पवार सर,ए जे शिंदे सर,लांडे सर,मुख्याध्यापक सर वदे सर यांचे मला अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शन मिळाले दिशाने 99%टक्के मिळवले त्याबद्दल मला खूप आनंद होत आहे आणि मला तिचा अभिमान वाटतो आहे वर्षभर तिने खूप मेहनत घेतली त्या मेहनतीचे फळ तिला मिळाले वर्षभर तिने मोबाईलचा कसल्याही प्रकारे वापर केला नाही फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित केलं

## विद्याभवन हायस्कूल कळंबची कु.रामपुरे अलसबा हिने 10 वी बोर्डाच्या परीक्षेत 100 टक्के

**बीड/प्रतिनिधि**

राज्य माध्यमिक शालांत परीक्षेत कळंब गावची रहीवाशी विद्याभवन हायस्कूल कळंबची विद्यार्थिनी कु. रामपुरे अलसबा रईस हिने १०० टक्के गुण घेत दहावी बोर्डाच्या परीक्षेत मोठे यश संपादन केले आहे. कु.रामपुरे अलसबा रईस ही सुरुवाती पासूनच हुशार विद्यार्थीनी आहे. तिने शालेय स्तरावर अनेक स्पर्धा परीक्षेत यश संपादन केले आहे. जिद्द मेहनत, चिकाटी च्या जोरावर तिने हे यश संपादन केले आहे. विद्याभवन हायस्कूलचे मुख्याध्यापक



शिक्षक वृंद यांच्या मार्गदर्शनाखाली तिने सातत्यपूर्ण अभ्यास करत हे यश संपादन केले आहे. तिने मिळवलेले गुण पुढील प्रमाणे मराठी ८९ संस्कृत १०० इंग्रजी ९७ गणित ९८ विज्ञान ९९ सामाजिक शास्त्र १०० गुण मिळवले आहेत, एकूण ५०० गुणा पैकी तिला ४९४+०६ एकूण १००% गुण मिळवलेले आहेत. तिचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.व तिला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देखील देण्यात आले आहे.

## मिलिंद विद्यालयाची उत्तुंग भरारी

**वादळवार्ता/परळी वै.**

शैक्षणिक वर्ष २०२३/२४ एस एस सी बोर्डाकडून घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत मिलिंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रतीवर्षा प्रमाणे याही वर्षी घवघवीत यश संपादन करून यशाची परंपरा कायम ठेवली. विद्यार्थ्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे कृषिमंत्री ना.धनंजयजी मुंडे साहेब , सचिव राजश्रीताई मुंडे, सहसचिव प्रदीपजी खाडे



सर यांच्या मार्गदर्शनाखाली मिलिंद विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एसएससी परीक्षेत उत्तुंग भरारी घेतली आहे. शाळेचा एकूण निकाल ९६.१५ टक्के असा लागला आहे.शाळेतून सर्वप्रथम येण्याचा मान कुमारी वैष्णवी गोपीनाथ कुंभार ९५.२० ?,सर्व द्वितीय कुमारी पूनम शिवलिंग कुंभार ९१.४० %,तर सर्व तृतीय जगताप आरती धोंडीराम ९०.४०% हे विद्यार्थी आले आहेत .चिरंजीव राठोड प्रवीण गोविंद या विद्यार्थ्याने संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत.

विशेष प्राविण्यासह ३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर प्रथम श्रेणीत ३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तसेच द्वितीय श्रेणी त २८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय नामदार श्री. धनंजयजी मुंडे साहेब,सचिव सौ.राजश्रीताई मुंडे,सहसचिव श्री.प्रदीपजी खाडेसाहेब, समन्वयक श्री.अतुल दुबेसर तसेच मुख्याध्यापक श्री. कदरकर सर,उप-प्राचार्य श्री. इरफान शेख सर, तसेच श्री किरण शिंदे सर ,पर्यवेक्षक श्री.धायगुडे सर यांनी केले.

## अवकाळी पाऊस व वादळी वा-यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामा करून तात्काळ नुकसान भरपाई द्या माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांची मागणी

**प्रतिनिधि/अंबाजोगाई**

अंबाजोगाई तालुक्यासह केज मतदारसंघात मागील काही दिवसांपासून अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई द्या आणि सातत्याने खंडित होत असलेला वीज पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी केली आहे. या प्रश्नी त्यांनी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना सोमवार, दिनांक २७ मे रोजी निवेदन दिले आहे. उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी नमूद केले आहे की, काल रविवार, दिनांक २६ मे रोजी अवकाळी पाऊस व वादळी वारा आल्यामुळे घरावरील पत्रे, शेतातील गोठे, उडून गेली आहेत तसेच फळबागांचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या बाबत तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी. तसेच गेल्या अनेक दिवसांपासून केज मतदारसंघात विज पुरवठा खंडीत झाल्याने नागरिकांना त्याचा नाहक त्रास होत आहे. सध्याच्या तापमान वाढीमुळे नागरिकांच्या अंगाची लाही-लाही होत आहे. अशा परिस्थितीत मतदारसंघात विविध ठिकाणी महावितरण अवेळी विजपुरवठा खंडीत करून नागरिकांच्या त्रासात भर टाकत आहे. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती ही खुप वाईट आहे. शेतकरी मानसिकदृष्ट्या खचला आहे. ज्या शेतकऱ्याकडे स्वतःचे थोडेफार पाणी आहे तो विजेअभावी वेळेवर जनावरांना पाणी देवू शकत नाही. तसेच शेतीला ही पाणी देवू शकत नाही. दिवसातून वारंवार विजपुरवठा खंडीत होत आहे. याचा परिणाम केज मतदारसंघात होणाऱ्या पाणी पुरवठ्यावर ही होत आहे. तसेच नागरिकांच्या मुलभूत सुविधा जसे की, पिठाची गिरणी व इतर कामे वेळेवर होत नाहीत. यापुढे विजपुरवठा खंडीत होणार नाही याची दखल घेण्यात यावी. अन्यथा आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनाच्या प्रती १) मा.एकनाथराव शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई., २) मा.अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई., आणि ३) मा.धनंजय मुंडे, कृषी मंत्री, म.रा.तथा पालकमंत्री बीड जिल्हा यांना पाठविण्यात आल्या आहेत. सदरील निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार पृथ्विराज साठे, तालुकाध्यक्ष अमर देशमुख, तारेख अली उस्मानी, व्यंकटेश चामनर, तानबा लांडगे, सुधाकर जोगदंड, ॲड.शहाजहान खान पठाण, मुनवर शेख, हमीद चौधरी, ॲड.नरेश साबणे, रविंद्र मोरे, धनराज सोनवणे, अमन परदेशी, सलिम पिंजारी, भाई चौधरी, रामभाऊ आडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तर यावेळी आश्रुबा करडे, देविदास देवकते यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विविध सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकनेते स्व. मेटे साहेबांच्या हरग्राम शिवसंग्राम अभियानास अनुसरुन डॉ.ज्योतीताई मेटे यांची आपुलकीची भेट दौ-यास सुरुवात..

**प्रतिनिधि/बीड**

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या हरग्राम शिवसंग्राम संकल्पनेनुसार शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई मेटे यांनी आज सोमवार दि.27 मे पासून बीड ग्रामीण भागाचा दौरा सुरु केला असून नाळवंडी सर्कलमध्ये शुक्रवार,दि.31 मे पर्यंत या भेटीगाठी दौरा होणार आहे.आज बकरवाडी,मौज,ब्रह्मगाव येथे सकाळच्या सत्रात भेटी देण्यात आल्या.समस्त गावकऱ्यांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले.याप्रसंगी शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायणदादा काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिलभाऊ घुमरे, बीड विधानसभा प्रमुख प्रा. सुभाष जाधव सर, बीड तालुकाध्यक्ष नवनाथ प्रभाळे, माजी सभापती ज्ञानेश्वर कोकाटे, किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, बीड तालुका उपप्रमुख सुनील कुटे,नाळवंडी सर्कल प्रमुख बळीभाऊ थापडे,मैदाचे उपसरपंच सिताराम घुमरे, शिवणीचे सरपंच विजय सुपेकर,विशाल जाधव तसेच नाळवंडी सर्कल मधील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते मेटे साहेबांच्या बाबतीत जनसामान्यांची प्रेम व आदराची भावना विलक्षण असून लोकनेते मेटे साहेबांच्या प्रभावी जनसंपर्काची अनुभूती मला येत आहे आपुलकीच्या या भेटीने मी भारावून गेले असून आपला स्नेह संबंध व सामाजिक बांधिलकीचे नाते कायम राहतील अशा भावना डॉ.ज्योतीताई मेटे यांनी यावेळी व्यक्त केल्या.आगामी काळात शिवसंग्राम तुमच्यासोबत खंबीरपणे उभा असेल अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. ग्रामस्थांकडून मान्यवरांचा यथोचित स्वागत सत्कार करण्यात आला.मौजचे शिवसंग्राम नेते वैभव डावकर, ब्रह्मगावचे शिवसंग्राम नेते उल्हास घोरड, बकरवाडीचे नेते अशोक गाडे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत सत्कार केला.भेटीदरम्यान गावातील ज्येष्ठ व महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

याप्रसंगी ब्रम्हगाव येथील बप्पासाहेब घोरड संतोष बिडवे उपसरपंच अर्जुनसिंग ठाकूर,प्रभाकर घोरड,विक्रम घोरड,एकनाथ घोरड,उल्हास घोरड, विकास घोरड,दादासाहेब घोरड,कांताराम घोरड,नितीन घोरड,गणेश घोरड,भाऊसाहेब घोरड, मच्छिंद्र घोरड यशवंत घोरड दिलीप घोरड बप्पा साहेब घोरड,रेवन घोरड, निलेश घोरड, विलास घोरड बकरवाडी येथील परमेश्वर गाडे,देविदास गाडे,विभीषण गाडे,विष्णुपंत काळे,मोतीराम गाडे एकनाथ गाडे,विष्णू गाडे,सो. रुक्मिणी गाडे आदी ..



सैफुद्दीन रहमान फहीम खान नेकनूर याने दहावी बोर्ड परिक्षेत ७६% घेतल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले प्रसंगी सय्यद यशिन,शेख शफिक, शेख फाहीम

## बीड जिल्ह्यातील बोगस व कृत्रिम बियाण्याची व खतांची टंचाई करून विक्री करणाऱ्या घोटाळा खोरांवर नियंत्रण ठेवा माजी सैनिक अशोक येडे जिल्हा अध्यक्ष

### मुख्यमंत्री, कृषी मंत्री, विभागीय आयुक्त,खते व बियाणे मुबलक उपलब्ध करा आम आदमी पार्टीच्या वतीने निवेदन

**प्रतिनिधि/बीड**

- बीड जिल्ह्यामध्ये येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना मुबलक बियाणे खते व अवजारे उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जिम्मेदारी आहे परंतु बीड जिल्ह्यातील मागील इतिहास पाहता शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक झालेली आहे, शेतकऱ्यांना बियाणे बोगस मोठ्या प्रमाणात विकण्यात आले होते व खतेही बोगस देण्यात आलेले आहेत तरी यावरती प्रशासनाने योग्य ती कारवाई करण्यात आलेली नसून यावर्षी ते वेळीच नियोजन करण्यात यावे, शेतकऱ्यांना मागेल त्या कंपनीचे बियाणे देण्यात यावे व मुबलक खते उपलब्ध करून द्यावे , बोगस ब्याने व खत विकणाऱ्या व्यापाऱ्यांवर नियंत्रण ठेवावे असे आढळल्यास किंवा शेतकऱ्यांनी तक्रार केल्यास त्या दुकानावर कंपनीवर किंवा व्यापाऱ्यावर तत्काळ तक्रारीचे निवारण करण्यात यावे मागील वर्षी संपूर्ण खते व बियाणे विकल्यानंतर बोगस खते व बियाणे विकल्याचे उघड केस झालेले आहे असे यावर्षी होऊ नये म्हणून प्रशासनाने योग्य ते नियोजन करावे असे असे निवेदन जिल्हाकृषी अधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री पालकमंत्री कृषी मंत्री विभागीय आयुक्त




यांना निवेदन आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने निवेदन देण्यात आले जर यावरती योग्य ती कारवाई झाली नाही किंवा प्रशासनाने केली नाही तर आपल्या कार्यालयासमोर सर्व शेतकऱ्यांना सोबत घेऊन आंदोलने करण्यात येतील असे निवेदन देण्यात आले यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे जिल्हा सचिव रामधन जमले शहर अध्यक्ष सय्यद सादेक तालुका उपाध्यक्ष आजम खान तालुका अल्पसंख्याक विभाग प्रमुख रफिक पठाण इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होत

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
मंगळवार २८ मे २०२४






# विधानसभेच्या जागांवरुन महायुतीत वादाची ठिणगी? संजय शिरसाट यांनी छगन भुजबळ यांना बजावलं

**मुंबई /प्रतिनिधि**

महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात अनेक मोठ्या घडामोडी घडण्याचे संकेत आहेत. त्यामागे कारण देखील तसंच आहे. कारण लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर लगेच सहा महिन्यांनी महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका पार पडणार आहेत. या विधानसभा निवडणुकीवेळी महाराष्ट्रातील राजकीय वातावरण वेगळं असणार आहे. कारण महाराष्ट्रातील दोन मोठ्या पक्षांमध्ये फूट पडली आहे. त्यामुळे दोन पक्षांचे चार पक्ष झाले आहेत. याशिवाय भाजप आणि काँग्रेस ही दोन





मोठी पक्ष आहेत. लोकसभा निवडणुकीवेळी महायुतीचं जागावाटप हे विद्यमान खासदारांच्या संख्येवरुन झालं. तर काही ठिकाणी कोणता उमेदवार जिंकून येऊ शकतो याची खात्री बघून जागावाटप झालं. या जागावाटपात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला कमी जागा मिळाल्या. पण आगामी विधानसभा निवडणुकीत आमच्या पक्षाला 80 ते 90 जागा मिळतील. भाजपने महायुतीत सहभागी होताना याबाबतचा शब्द दिला होता, असा दावा छगन भुजबळ यांनी केलाय. त्यांच्या याच वक्तव्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी आक्षेप घेतला आहे.

"छगन भुजबळ यांनी जे वक्तव्य केलेलं आहे त्याच्याशी आम्ही सहमत नाही. छगन भुजबळ यांच्या मनात नेमकं काय आहे, त्याचा खुलासा त्यांनी लवकर केला तर बरं राहील. कारण अशीच मागणीचा प्रत्येक पक्ष करायला लागला तर मग कुठेतरी समन्वय कमी पडेल आणि विरोधकांच्या हाती आयतं कोलित लागेल हे त्यांनी लक्षात ठेवावं. त्यामुळे महायुती धर्मामध्ये कुठलाही खल पडेल असं वक्तव्य त्यांनी करता कामा नये", असा शब्दांत संजय शिरसाट यांनी भुजबळांना सुनावलं आहे.

## विधान परिषदेच्या निवडणुकीवर शिरसाट काय म्हणाले?

"विधान परिषदेच्या चार जागांबद्दलचा निर्णय मुख्यमंत्री घेतील. अनेक गोष्टी मात्र निश्चित आहेत की चार जागा शिवसेना काही लढवणार नाही आणि ज्या योग्य जागा आमच्या वाट्याला असतील त्या जागा आम्ही लढवू. पण अंतिम निर्णय हा मुख्यमंत्रीच घेतील", अशी प्रतिक्रिया संजय शिरसाट यांनी दिली.

## पालकांची पहिली पसंत म्हणजे सिंदफणा

माध्यमिक व उच्च माध्यमिक वडवणी विदयालययाला वडवणी परिसरात विद्यार्थी आणि पालक वर्ग सिंदफणा विद्यालय या नावाने ओळखतात या विद्यालयाने आतापर्यंत अनेक विद्यार्थी यशस्वीरित्या घडवले म्हणून शाळेची इमारत वडवणी शहराच्या मध्यभागी असून अत्यंत सुसज्ज्याने सुख सोयींनी युक्त आहेअत्यंत सुसज्ज आणि सुख सोयींनी युक्त आहे या शाळेवर अध्यापन कार्य करण्यासाठी अत्यंत तज्ञ शिक्षक वर्ग आहे इयत्ता दहावी आणि बारावी विज्ञान आणि कला शाखा चा निकाल उत्कृष्ट लागत असल्याने वडवणी परिसरातील पालक वर्ग आपल्या पाल्याला येथे शिकविण्यासाठी पहिली पसंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ला देताना दिसून येत आहेत

# किसान विद्यालयातून कु.भाग्यश्री कदम प्रथम

**नांदेड प्रतिनिधी**

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील किसान विद्यालयाचा दहावीचा निकाल ८५ टक्के इतका लागला असून येथे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावी परीक्षेत कु.भाग्यश्री गणेश कदम हिने ८८.४० टक्के गुण घेऊन विद्यालयातून प्रथम क्रमांक ईश्वर राठोड याने ८७.४० टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर दिपक राठोड याने ८४.४०टक्के घेऊन



तृतीय क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. तर विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळाल्याबद्दल कु.भाग्यश्रीचे सर्वत्र कौतुक होत आहे. भाग्यश्री कदम,ईश्वर राठोड, दिपक राठोड यांच्यासह उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री.स्वप्निल पाटील उमरेकर मुख्याध्यापक श्री.पदमवार पि.व्ही सिरसाट, एम.एम. बच्चेवार,जी.टी.सिरसाट, ए.डी. शिंदे, बी.डब्ल्यू कदम ,शिवाजी तुंबरफळे सरपंच साईनाथ पवार विद्यार्थ्यांचे पालक गणेश कदम, गजानन राठोड, दत्ता राठोड यांच्यासह विद्यालयातील शिक्षक आई-वडील नातेवाईक यांनी शुभेच्छा देऊन कौतुक केले.तसेच सर्व स्तरांमधून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# खरात आडगाव जलजीवनचे काम बोगस गुत्तेदारा विरोधात कारवाई करण्याची सर्वसामान्य नागरिकाची मागणी.

## गढूळ पाण्यामुळे गावकऱ्यांच्या आरोग्य धोक्यात.,सरपंचाचे टक्केवारीसाठी दुर्लक्ष का ?

**(बीड प्रतिनिधी)**

....माजलगाव तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींअंतर्गत जलजीवन अंतर्गत कामे करण्यात आली. काही ठिकाणी बोगस काम झालेले आहे. बोगस कामाबाबत बऱ्याच ठिकाणच्या जिल्हा परिषदेकडे तक्रारी देखील करण्यात आलेलेआहेत. खरात आडगाव येथील काम बोगस निकृष्ट दर्जाचे झालेले असून संबंधित कामाची चौकशी करून संबंधित कॉन्ट्रॅक्टदार व गुत्तेदार यांच्यावर कारवाई करून ते काम चांगल्या पद्धतीने करून घेण्याची मागणी गावकऱ्यांकडून होत आहे परंतु अनेक नागरिकांचे आरोग्य या गढूळ पाण्यामुळे आरोग्य धोक्यात येत आहे परंतु याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत आहे ग्रामपंचायत ने ठराव घेऊन हे काम चांगल्या पद्धतीने करून घेण्यात यावे असे सुद्धा काही वरिष्ठ नागरिकाकडून दबक्या आवाजात बोलले जाते परंतु टक्केवारीच्या नादात सरपंच लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते व काही विघ्न संतोषी पत्रकार यामध्ये सामील असल्याची चर्चा दपक्या आवाजात नागरिकाकडून बोलले जाते हे मात्र खरे



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com